


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १२९, मंगळवार ३० जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## लोकसभा होऊ द्या, त्यांची डफडीही काढून घेतो!

### ■ आ. नीलेश लंके यांनी खा. डॉ. विखे व समर्थकांना पुन्हा डिवचले ■ कळस व गारखिंडी येथे विकास कामांचे भुमिपूजन व लोकार्पण

कळस, गारखिंडी : विशेष प्रतिनिधी

**प्रत्येक गावात त्यांनी चार सहा डफडं वाजविणारे हाताशी धरलेले आहेत. ते तिकडून निघाले की यांनी डफडं वाजवायला सुरूवात करायची. एकदा लोकसभेची निवडणूक होउ द्या, त्यांचे डफडेही मी काढून घेतो. ती कर्तव्यशुन्य माणसे आहेत. मोठ मोठया गप्पा मारायच्या, स्टेजवर भाषणे करायची अशा लोकांवर विश्वास ठेऊ नका. असे सांगत आमदार नीलेश लंके यांनी खा. डॉ. सुजय विखे व त्यांच्या समर्थकांना पुन्हा डिवचले.**

यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य निवृत्तीनाना गाडगे, कळसचे सरपंच राहुल गाडगे, उपसरपंच सविता गाडगे, पांडूरंग येवले, शशिकांत गाडगे, सेवा संस्थेचे चेअरमन शिवाजी गलांडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष भाऊ नाना गाडगे, बापूसाहेब शिर्के, बाबाजीशेठ भंडारी, ठकाराम लंके, बाळासाहेब पुंडे, गारखिंडीचे सरपंच निवृत्ती चौधरी, दरोडीचे सरपंच दिनेश चौगुले, सचिन साखला, सोमनाथ वरखडे, किरण पानमंद, दत्ता म्हस्के, श्रीकांत डेरे, रामदासशेठ गाडगे यांच्यासह विविध गावांचे सरपंच, सदस्य, सेवा संस्थांचे पदाधिकारी व संचालक ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने सभामंडपाची मागणी करण्यात आली त्यावर भाष्य करताना लंके म्हणाले, निश्चितच सभा मंडप देऊ, मी कुठे जात नाही आणि तुम्हीही कुठे जात नाहीत. मी गुळ शेंगदाणे वाटणारांमधला नाही. काम करणारा आहे. निवडणूक आली की फिरकणारा नाही. आता पाच वर्षानंतर गावागावांत शेंगदाणे, गुळ येऊ लागले आहे. परत पाच वर्षे लोक जिवंत आहेत की मरण पावले हे पाहण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नाही. काहीही अडचण आली तर मी तुमच्या सेवेसाठी सदैव हजर आहे. डफडं वाजविणारे काही घेऊन आले तर त्यांच्यावर विश्वास ठेऊ नका. मी आमदार झालो, माझ्या आगोदर ते सहा महिने खासदार झाले त्यांनी काही दिले का ? एक रूपयाचे काम दिले नाही त्यामुळे मोठयांच्या नादी लागू नका आपले ते आपले असते. काही झाले तर कान धरून हक्काने सांगता येते असे सांगत आ. लंके यांनी खा. डॉ. विखे व त्यांच्या समर्थकांवर सडकून टीका केली.



■ कळस येथील विविध विकास कामांचे भुमिपूजन व लोकार्पण आ. नीलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आले.

### माझा राजयोग कोणी खेचून घेऊ शकत नाही !

मी तुम्हाला सभा मंडपाचा शब्द दिला आहे, परंतू लवकरच आचारसंहिता लागू होईल तुम्ही म्हणाल कुठेय सभामंडप. परंतू माझा कार्यकाळ आजून शिल्लक असेल ना ? या टर्मचा. तसा माझ्या नशिबातला राजयोग कोणी खेचून घेऊ शकत नाही. मला तर एकाने सांगितले आहे की तु जोपर्यंत कंटाळणार नाहीस तोपर्यंत तुच राहणार आहेस. त्यामुळे दुसरे कोणी स्वप्न पाहू नये. इकडे जिरवली आहे आता दुसरीकडे जाऊन जिरवायची आहे असे आ. लंके म्हणाले.

### तालुक्याच्या स्वाभिमानासाठी एकत्र या

झेडपीच्या प्रशासकीय मान्यता चोरून स्वतःच्या नावावर कामे खपविणारी ही मंडळी आहेत. समोरासमोर लेखा जोखा घेऊन बसा, कळेल कोण काम करतंय ते. मंगळवारी १९ कोटी ५५ लाख रूपये खर्चाच्या कामांचे भुमिपूजन, लोकार्पण करण्यात येणार आहे. हे आकडे खोटे आहेत का ? तुमचे कामातून कर्तुत्व सिध्द झाले पाहिजे. केवळ एकमेकांची जिरवायची. सत्तेचा गैरवापर करून याला पकडून द्या, त्याला पकडून द्या हे धंदे विरोधकांचे आहेत. गावाचे राजकारण काही असो तालुक्याच्या स्वाभिमानासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे.

आ. नीलेश लंके

### त्यांचे पीए देखील फोन उचलत नाहीत !

मागच्या पाच वर्षापूर्वी सरपंच, सदस्य, संचालकांना त्यांनी दिवाळी वाटली होती. आता दाळ आणि गुळ वाटताहेत. दोन चार ताशा वाजवणारे आहेत आपल्या तालुक्यात. साहेबांची दाळ आणि गुळ आला. त्यांना सांगा ती दाळ आणि गुळ तुझ्याच घरात ठेव. त्यांचा एक रूपयांचा निधी नाही. तरीही लोक त्यांना भाळतात. आपलं ते आपलं असतं हे लक्षात ठेवा. मोठयांचा तुम्हाला थांगपत्ताही लागत नाही. त्यांचे पीए देखील फोन उचलत नाहीत. ते तर लांब राहिले असे सांगत लंके यांनी टीकाश्र सोडले.

### मी सात कोटी दिले तुम्ही सात लाख तरी द्या ना

कळसमध्ये बोलताना आ. लंके म्हणाले, नीलेश लंके यांनी आम्हाला सात कोटींचा निधी दिला. आजूनही कोटी दोन कोटी निधी देतील तुमचे काय असा सवाल डफडे वाजविणारांना विचारा. लंकेंनी सात कोटी रूपये निधी दिला तर तुम्ही सात लाख तरी द्या ना अशी मागणी त्यांच्याकडे करा असे आ. लंके म्हणाले.

## अशोककाका कटारिया यांना अटक

### ■ अर्बन बँकेतील गैरव्यवहाराचा ठपका ■ आर्थिक गुन्हे शाखेची सोमवारी आळेफाट्यामध्ये कारवाई

नगर : प्रतिनिधी






**शतक महोत्सवी ११३ वर्षांची प्रदिर्घ परंपरा असलेल्या नगर अर्बन मल्टीस्टेट शेडयुल्ड बँकेचे ७२ वर्षीय माजी चेअरमन अशोकलाल माधवलाल कटारिया रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर यांना बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी पहाटे आळेफाटा जि. पुणे येथून अटक केली.**

मा. खा. स्व. दिलीप गांधी यांचे चिरंजीव सुवेंद्र गांधी यांचे निकटवर्तीय असलेले अशोक कटारिया हे आळेफाटा येथून पसार होण्याच्या तयारीत असतानाच सोमवारी पहाटे आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

गेल्या काही महिन्यांपासून अर्बन बँकेतील गैरव्यवहार गाजत असून गैरव्यवहाराप्रकरणी पोलीसांनी २६ जानेवारी रोजी बँकेचे माजी उपाध्यक्ष अनिल कोठारी व माजी संचालक मनेश साठे यांना अटक केली. २ फेब्रुवारीपर्यंत त्यांना पोलीस कोठडी देण्यात आली आहे. दरम्यान, मा. खा. स्व. दिलीप गांधी यांच्या कुटूंबियांच्या अडचणींमध्ये वाढ झाली असून सध्या गांधी कुटूंबिय नगरमध्ये नसल्याची माहिती आहे. या गैरव्यवहार प्रकरणी सुरूवातीस बँकेचे अधिकारी प्रदीप पाटील व राजेंद्र लुनिया यांना अटक करण्यात आली होती. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत.

उर्वरीत पान ३ वर

## झोपेतून उठून जरांगेंनी भाळी लावला पारनेरकरांचा गुलाल!

### मुंबईहून परतताना सुपे येथे जोरदार स्वागत



■ नवी मुंबई येथून आंतरवली सराटी येथे परतताना जरांगे पाटील यांचे सुपा येथे जोरदार स्वागत करण्यात आले.

सुपा : शरद रसाळ

**मुंबईत पोहचण्यापूर्वीच राज्य शासनाने मराठा आरक्षणाचा अध्यादेश जारी केल्यानंतर विजयी मुद्रेने आंतरवली सराटीकडे निघालेल्या मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या ताफयाचे सुपे येथे पारनेर तालुक्याच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. थकव्यामुळे गाडीमध्ये झोपलेल्या जरांगे यांनी पारनेरकरांच्या आग्रहाखातर झोपेतून उठून पारनेरकरांचा गुलाल भाळी लावत पुढील प्रवास सुरू केला.**

नवी मुंबई येथे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जरांगे पाटील यांनी फळांचा रस घेत आपले उपोषण मागे घेतले. मराठा आरक्षणासंदर्भातील अध्यादेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जरांगे पाटील यांच्याकडे सुपूर्द केल्यानंतर जरांगे पाटील हे आंतरवली सराटीकडे जाण्यासाठी निघाले. प्रवासादरम्यान त्यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.

मराठा आंदोलनाचा विजय झाल्यानंतर आंतरवली सराटीकडे जाणाऱ्या मनोज जरांगे यांचे सुपे येथे स्वागत करण्यासाठी तालुक्यातील मराठा बांधवांनी दुपारी साडेचार वाजता सुपे येथे जमण्याचे आवाहन उद्योजक योगेश रोकडे यांनी केले होते. त्यांच्या आवाहानास प्रतिसाद देत हजारो मराठा बांधव सुपे येथे जमले होते. जरांगे यांचा ताफा अपेक्षेपेक्षा उशिरा येऊनही मराठा बांधवांची गर्दी मात्र कायम होती. सुपे येथे जरांगे यांचा ताफा आला, त्यावेळी जरांगे पाटील हे थकव्यामुळे गाडीमध्ये झोपलेले होते. त्यांना थकवा आल्याने त्यांना उठवू नका अशी भूमिका चालकाने घेतली तरीही मराठा बांधव त्यांचा सत्कार करण्याच्या भूमिकेत होते. समाजबांधवांच्या गोंधळामुळे जाग्या झालेल्या जरांगे पाटील यांनी मात्र आपल्या बांधवांची मागणी मान्य करीत पारनेरकरांचा गुलाल आपल्या भाळी लावत गाडीतच पारनेरकरांचा सत्कार स्विकारला.

## बेवारस 'प्रिन्सेस'ला प्रियंकाताईंच्या मायेची उब!

### यादव दाम्पत्याच्या संवेदनशिलतेला पारनेरकरांचा सलाम

वाडेगव्हाण : प्रतिनिधी

**जेमतेम चार पाच दिवसांच्या नवजात मुलीस निर्दयी मातेने नगर -पुणे महामार्गावरील वाडेगव्हाण शिवारातील बंद अवस्थेत असलेल्या हॉटेलमध्ये टाकून दिले. त्याची माहीती वाडेगव्हाणच्या सरपंच प्रियंका यादव व त्यांचे पती उद्योजक किशोर यादव या दाम्पत्यास समजल्यानंतर दोघांनी तिथे धाव घेत बेवासरपणे पडलेल्या त्या प्रिन्सेसला प्रियंकाताई यांनी कुशीत घेत मायेची उब दिली. यादव दाम्पत्याच्या संवेदनशिलतेस पारनेरकारांनी सलाम केला आहे.**




■ नगर-पुणे महामार्गावरील बंद हॉटेलमध्ये बेवारस बालिकेस सोडून देण्यात आले होते.

जन्माला येऊन चार पाच दिवस झालेल्या प्रिंन्सेसला निर्दयी पालकांनी सोडून दिल्यानंतर बंद असलेल्या हॉटेलमधून वाडेगव्हाणच्या एका नागरीकास बाळाच्या रडण्याचा आवाज आला. त्याने जवळ जाऊन पाहिले असता बेवारस अवस्थेतील एक बालक तिथे मोठयाने रडत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ सरपंच प्रियंका यादव यांचे पती किशोर यादव यांना त्याबाबत माहीती दिल्यानंतर यादव दाम्पत्याने क्षणाचाही विचार न करता बंद पडलेल्या हॉटेलच्या दिशेने धाव घेतली. जीवाच्या आकांताना रडत असलेल्या प्रिन्सेसला पाहून यादव दाम्पत्याचे मन हेलावून गेले. प्रियंकाताई यांनी कशाचीही वाट न पाहता पिन्सेसला जवळ घेत मायेची उब दिली आणि रडणारी प्रिन्सेस शांत झाली.

पुढे गावातील डॉ. नरवडे यांच्याकडे नेण्यात येउन त्याची तपासणी करण्यात आली. कायदेशीर बाब म्हणून किशोर यादव यांनी सुपा पोलीसांना त्याबाबत माहीती दिली. सुपा पोलीसांनीही मराठा योध्दा मनोज जरांगे यांच्या परतीचा दौरा असतानाही पोलीस मदत तसेच रूग्णवाहिका वाडेगव्हाण येथे पाठवून प्रिन्सेसला ताब्यात घेण्यात आले. बेवारस सापडलेल्या प्रिन्सेसची स्टेशन डायरीला नोंद घेण्यात येऊन प्रिन्सेसला नगरच्या स्नेहालयाकडे सूपूर्द करण्यात आले.



■ बेवारसपणे सापडलेल्या प्रिन्सेसला सरपंच प्रियंकाताई यादव यांनी जवळ घेत मायेची उब दिली.

### आणि प्रिन्सेस खुदकन हसली !

जीवाच्या आकांताने रडत असलेल्या प्रिन्सेसला पाहून दोन मुलांच्या आई असलेल्या सरपंच प्रियंकाताई यादव यांचा जीव कासाविस झाला. त्यांनी प्रिन्सेसला जवळ घेऊन कुशीत घेताच जीवाच्या आकांताने रडत असेलेली प्रिन्सेस शांत झाली. मातृत्वाचाच स्पर्श झाल्याचा भास झाल्याने प्रिन्सेस प्रियंकाताई यांच्याकडे पाहून खुदकन हसली.

### दूध पिऊन प्रिन्सेस तृप्त !

जीवाच्या आकांताने रडत असलेली प्रिन्सेस भुकेने व्याकूळ झाली होती. प्रियंकाताई यांनी लगेच दूधाची व्यवस्था करून बाटलीने तिला दूध पाजले. दूध पिऊन तृप्त झालेली प्रिन्सेस त्यानंतर प्रियंकाताई यांच्याच कुशीत झोपी गेली !

### प्रिन्सेसला दत्तक घेण्याची तयारी

बेवारसपणे सापडलेल्या प्रिन्सेसला दत्तक घेण्याची तयारी किशोर प्रियंका यादव दाम्पत्याने दर्शविली होती. मात्र कायदेशीर बाबींच्या पुर्ततेनंतरच या गोष्टींचा विचार करण्यात येईल असे पोलीसांकडून सांगण्यात आले.



# निरामय



## शस्त्रक्रिया केव्हा?

कृत्रिम गुडघा प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया साधारणपणे रुग्णाच्या साठीनंतर करायचा सल्ला दिला जातो. कारण बसवलेला कृत्रिम गुडघा सुमारे वीस- बावीस वर्षे टिकतो. अर्थात लहान वयात शस्त्रक्रियेला पर्यायच नाही अशी रुग्णाची स्थिती असेल तर ती केली जाते. पण शक्यतो लहान वयात शस्त्रक्रिया टाळण्याचा प्रयत्न केला जातो. पण अशा रुग्णांमध्ये कृत्रिम गुडघ्याचे वीस वर्षांचे वय उलटले की पुन्हा शस्त्रक्रियेची गरज पडू शकते. त्याला रीव्हिजनल रीप्लेसमेंट शस्त्रक्रिया म्हणतात.



**डॉक्टर... माझा गुडघा खूप दुखतोय... तुम्ही माझी नी रीप्लेसमेंट करून टाका! म्हणजे पुन्हा कटकट नको! असा तक्रारवजा सल्ला घेऊन अनेक रुग्ण डॉक्टरांकडे येतात. गुडघ्याच्या जुनाट दुखण्यावर नी रीप्लेसमेंट शस्त्रक्रिया करून कृत्रिम गुडघा बसवता येतो हे त्यांना माहीत असते. सततच्या दुखण्यापेक्षा एकदाची शस्त्रक्रिया करून टाकलेली बरी! अशी त्यांची भावना असते. पण नी रीप्लेसमेंट हा गुडघेदुखीवरचा एकमेव उपाय निश्चितच नाही. तो अंतिम उपाय आहे. ही शस्त्रक्रिया नेमकी केव्हा करतात, कृत्रिम गुडघा बसवतात म्हणजे काय, हे जाणून घेऊ...**

# गुडघ्याची कुरकूर...

गुडघ्याचे दुखणे घेऊन जेव्हा रुग्ण डॉक्टरांकडे जातो तेव्हा त्याला दुखणे कमी करणारी गोळ्या- औषधे दिली जातात, थोडी विश्रांती घ्यायला, गुडघा कोमट पाण्याने शेकायला सांगितले जाते. एवढे करूनही रुग्णाला बरे वाटले नाही तर त्याला चालताना नी कॅप वापरून पाहायला सांगतात, हातात काठीचा आधार घ्यायलाही सुचवतात. या सर्व गोष्टी करून झाल्या आणि दुखणे आटोक्यात आले तर ते पुन्हा उद्भवू नये म्हणून विशिष्ट व्यायाम करायला सांगितले जाते. त्यानंतरचा टप्पा म्हणजे रुग्णाचे वजन अधिक असल्यास ते कमी करायला सांगणे. पण सर्व उपाय करूनही गुडघ्याचे दुखणे कमी झालेच नाही तर अंतिम उपाय म्हणून कृत्रिम गुडघा प्रत्यारोपणाचा विचार केला जाऊ शकतो. हा विचार करताना गुडघेदुखीची तीव्रता आणि ते दुखणे किती जुने आहे या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक असते. गुडघ्याला मार लागणे, फ्रॅक्चर होणे किंवा वयस्कर व्यक्तींना गुडघ्याची झीज झाल्यामुळे झालेली गुडघेदुखी या प्रकारांत उपचार सुरू असूनही दुखणे पूर्णपणे जाण्यास दीड- दोन महिन्यांचा कालावधी लागू शकतो. चार-पाच महिने डॉक्टरांनी सांगितलेले सर्व उपाय भक्तिभावाने करूनही दुखणे जाण्याचे नावच घेत घेत नसेल तरच शस्त्रक्रियेचा पर्याय तपासून पाहिला जातो.

## व्यायाम का गरजेचा?

**वाढलेले वजन आणि व्यायामाचा अभाव सांधेदुखीला कारणीभूत ठरतात. चालताना, व्यायाम करताना गुडघ्याची दोन हाडे एकमेकांवर दाबली जातात. असे होताना दोन हाडांमधील वंगणही हाडांवर दाबले जाऊन ते हाडाच्या आवरणामधून आत झिरपते. या वंगणात प्राणवायू असतो. वंगण कूर्चेच्या आत दाबले गेल्याने कूर्चेचे पोषण होते आणि कूर्चा निरोगी राहते. अर्थातच तो सांधाही निरोगी राहतो. म्हणून व्यायाम महत्त्वाचा. वजन आटोक्यात राहणे हा व्यायामाचा अप्रत्यक्ष फायदा असतो.**



## गुडघ्याची झीज कशी होते?

व्यक्तीचे वय लहान असताना अपघात होणे, संधीवात, युरिक ॲसिड वाढलेले असणे आदी कारणांमुळे गुडघेदुखी होऊ शकते. पण गुडघा झिजल्यामुळे झालेली गुडघेदुखी साधारणपणे वयाच्या साठीनंतरच डोके वर काढते. हाडांचा पृष्ठभाग निरोगी असताना गुळगुळीत असतो. गुडघ्याच्या दोन हाडांच्या मध्ये असलेल्या कूर्चेला वैद्यकीय भाषेत मेनिस्कस म्हणतात तर हाडाच्या वरील कूर्चेला (आवरणाला) कार्टिलेज म्हणतात. वय वाढत जाते तसे दोन हाडाच्या मधले मेनिस्कस आधी झिजू लागते, मग हाडाच्या वरील कार्टिलेजही झिजण्यास सुरूवात होते. झीजेमुळे हाडांचा पृष्ठभाग खडबडीत व्हायला लागतो. त्याला बारीक भेगा पडायला लागतात. पुढे या भेगा मोठ्या होत जाऊन आणि हाडाच्या पृष्ठभागावर खड्डे पडू लागतात. या खड्ड्यांमुळे दोन हाडांचे एकमेकांवरील घर्षण वाढते आणि दुखणे सुरू होते. हाडे एकमेकांवर घासली जाऊन तिथे पाणी निर्माण होते आणि गुडघा सुजतो. हाडाच्या कूर्चे ला अजिबात संवेदना नसतात. हाडाच्या आत मात्र नर्व्हज् असतात. त्यामुळेच कूर्चा झिजून जेव्हा हाड उघडे पडते आणि हाडावर हाड घासले जाते तेव्हा तीव्र वेदना होतात आणि टाकलेले प्रत्येक पाऊल क्लेशदायक बनते. दोन निरोगी हाडे एकमेकांवर अगदी चपखल बसलेली असतात. जेव्हा एखादे हाड मार लागून फ्रॅक्चर होते, तेव्हा त्याचा आकार काहीसा बदलतो. गुडघ्याच्या आतील हाडाच्या आकारात सुमारे ४ मिलिमिटरपेक्षा अधिक फरक पडला तर दुखणे सुरू होते.

## कृत्रिम गुडघा प्रत्यारोपणाचे प्रकार

गुडघ्याला तीन कप्पे असतात. शरीराच्या आतल्या बाजूचा कप्पा, बाहेरच्या बाजूचा कप्पा आणि गुडघ्याच्या वाटीच्या मागचा कप्पा. भारतीय रुग्णांमध्ये यातील आतला आणि बाहेरचा कप्पा खराब झालेला दिसतो. क्वचित कुठलातरी एकच कप्पा खराब झालेलाही आढळतो. गुडघ्याचा एकच कप्पा बदलण्याच्या शस्त्रक्रियेला युनिकंपार्टमेटल नी रीप्लेसमेंट म्हणतात, तर दोन कप्पे बदलण्याच्या शस्त्रक्रियेला टोटल नी रीप्लेसमेंट म्हणतात. भारतीय रुग्णामध्ये सहसा गुडघ्याची वाटी खराब होत नाही. पण पाश्चात्य रुग्णामध्ये ही वाटीही सर्रास खराब झालेली आढळते. आपल्याकडे जमिनीवर मांडी घालून बसणे, उकीडवे बसणे या हालचाली अगदी रोज केल्या जातात. अशा प्रकारच्या नियमित हालचाली गुडघ्याची वाटी खराब न होण्यासाठी कारणीभूत ठरत असावी. काही वेळा तरुण रुग्णांमध्ये गुडघ्याला केवळ बाक आलेला आढळतो. अशा वेळी गुडघ्याचा एखादाच कप्पा खराब व्हायला सुरुवात झालेली असते. अशा वेळी शस्त्रक्रियेत गुडघ्याचा बाक सरळ केला जातो. याला हायटिबिअल ऑस्टिओटॉमी म्हणतात. यासाठी कोणताही कृत्रिम भाग गुडघ्यात बसवण्याची गरज पडत नाही. दोन्ही गुडघे एकदम एका वेळी बदलण्याच्या शस्त्रक्रियेला बायलॅटरल नी रीप्लेसमेंट म्हणतात. पूर्वी अशा रुग्णांमध्ये एक गुडघा आधी बदलून सुमारे पंधरा दिवसांनी दुसरा गुडघा बदलला जात असे. पण दोन्ही गुडघे बदलण्याची आवश्यकता असेल तर ते एकदमच बदण्याचे काही फायदे असल्याचे दिसून आले आहे. जंतूसंसर्गाचा धोका कमी होणे, शस्त्रक्रियेत होणारे काही विशिष्ट खर्च कमी होणे असे हे फायदे आहेत. कृत्रिम गुडघारोपणाची शस्त्रक्रिया झाल्यावर दोन-तीन दिवसांत रुग्ण चालू शकतो. पहिले पंधरा दिवस वॉकर घेऊन चालण्याचा सल्ला दिला जातो. त्यापुढील पंधरा दिवस काठीचा आधार घेऊन चालायला सांगतात. महिना-दीड महिन्याने रुग्ण सुटा चालू शकतो. त्याला टप्प्याटप्प्याने फिजिओथेरपीचे व्यायामही सांगितले जातात. या शस्त्रक्रियेनंतर चालणे- फिरणे, वाहन चालवणे, जिने चढणे- उतरणे, मांडी घालून बसणे या हालचाली करताना व्यक्तीला काहीही अडचण येत नाही. पण सहसा उकिडवे बसणे अशा व्यक्तीला जमत नाही. तसेच त्याला टेनिस, बॅडमिंटनसारखे मैदानी खेळ न खेळण्याचा सल्ला दिला जातो. अर्थात रुग्ण वयस्कर असले तर त्याला मैदानी खेळ खेळण्याची अपेक्षाही नसते. पण दुखण्यामुळे जे रुग्ण चालूही शकत नसतात. त्यांचे रोजचे जीवन नक्कीच सुकर होते.

## गुडघेदुखीबद्दलच्या काही ठळक गैरसमजुती



- वय वाढल्यावर गुडघ्यातील तेल किंवा वंगण कमी झाले म्हणून गुडघा कुरकुरतो, अशी लोकांची समजूत असते. ही मोठी गैरसमजूत आहे. वयानुसार वंगण नव्हे तर त्याची गुणवत्ता कमी होत असते.
- गुडघ्यांतील वंगणाला सायनोव्हिअल फ्लुइड म्हणतात. त्याला एक प्रकारचा चिकटपणा, घनता असते. हालचाली करताना वंगणाच्या चिकटपणामुळेच हाडे एकमेकांपासून विलग राहू शकतात. हाडांच्या झिजेबरोबर वंगणाची घनता कमी होऊन ते पातळ होते. वंगण पातळ झाल्यावर हाडे एकमेकांच्या जवळ येतात आणि घर्षणास सुरुवात होते.
- वयामुळे हाडे ठिसूळ झाल्यामुळे आपला गुडघा दुखतो असे अनेक रुग्ण सांगतात. ही आणखी एक गैरसमजूत आहे. हाडे ठिसूळ झाली तर ती लवकर मोडतात. आपण आपल्या उंचीएवढ्या उंचीवरून पडलो आणि हाड फ्रॅक्चर झाले तर अशा व्यक्तीची हाडे मुळातच ठिसूळ आहेत असे म्हणतात. हाडे कमकुवत असतील तर अंग दुखेल, अशक्तपणाही वाटू शकेल. पण ठिसूळ हाडे कोणताही विशिष्ट सांधा दुखायला कारणीभूत ठरत नाहीत.

**गुडघेदुखीचा त्रास केवळ वृद्ध मंडळींनाच होतो असे नाही. वयाच्या ४५ वर्षांनंतर पुरुष व स्त्रिया अशा दोघांमध्ये हा आजार मोठ्या प्रमाणात दिसतो. त्यातही रुग्णांमध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. ४५ ते ६४ या वयोगटात ३० टक्के, तर ६५ वर्षांनंतर ६८ टक्के महिलांमध्ये गुडघेदुखी आढळत असल्याचे एका पाहणीतून निदर्शनास आले आहे. गुडघेदुखीची अनेक कारणे आहेत. ते जाणण्यासाठी गुडघ्याची रचना माहीत असणे गरजेचे आहे. चार वेगवेगळी हाडे मिळून गुडघा तयार होतो. याबरोबर मांसपेशी, टेंडन्स, कार्टीलेज आणि लिगामेन्ट्स यांचाही गुडघा तयार होण्यात समावेश असतो. त्यावर एक सायनोवीयल सॅक नावाचे आवरण असते व ते एक द्रव्य तयार करते. त्याला सायनोवियल फ्लुईड म्हणतात. गुडघ्याच्या हालचालींसाठी हे द्रव्य अत्यंत महत्त्वाचे असते. आपल्या शरीराचे संपूर्ण वजन गुडघ्यावर असते.**



# महिलांनाच जास्त गुडघेदुखीचा त्रास!

## आजाराचे निदान

गुडघेदुखीच्या कारणाचे निदान करण्यासाठी रुग्णांकडून प्रथम दुखण्याविषयी संपूर्ण माहिती घेणे आवश्यक ठरते. रुग्ण धावत असताना कधी व किती ताण गुडघ्यावर पडला, गुडघ्याला मार लागला काय, गुडघ्यामध्ये ताठपणा जाणवतो काय, आपोआप त्रास उत्पन्न झाला की इतर कारणाने त्रास सुरू झाला हे लक्षात घेतले जाते. रुग्णाच्या रक्ताच्या तपासणीद्वारे दुखण्याचे कारण शोधता येते. शिवाय क्ष- किरण तपासणीद्वारे रुग्णाचे हाड मोडले असेल किंवा हाडांची झीज झाली असल्यास ते कळते. क्ष- किरण तपासणी केल्यानंतरही शंका उरली तर एमआरआय तपासणी करता येते. यात हाडांबरोबर लिगामेन्ट, कार्टीलेज, टेंडन यांच्या संबंधित आजार असेल तर तेही कळू शकते.



## औषधोपचार करताना...

सर्वसाधारणपणे रुग्णांना प्रथम दुखणे कमी करण्याच्या (पेनकिलर) गोळ्या दिल्या जातात. सोबत गुडघ्याला बर्फाने शेकण्यास सांगितले जाऊ शकते. रुग्णाच्या गुडघ्यात संसर्ग असेल तर प्रतिजैविके दिली जातात. प्रसंगी गुडघ्यातील जखम भरून येण्यासाठी क व ब जीवनसत्त्वाचीही मदत घेतली जाते. वयस्क पुरुषांना गुडघेदुखीचा त्रास असल्यास तसेच मासिक पाळी थांबल्यानंतर स्त्रियांनी कॅल्शियमच्या गोळ्यांचे सेवन केल्यास त्यांना लाभ होतो. परंतु कोणत्याही गोळ्या घेण्यापूर्वी आपल्याला डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. हाड खराब झाल्यास शस्त्रक्रियेद्वारे कृत्रिम गुडघा बसवण्याचा पर्याय देखील असतो.



## ही आहेत कारणे

- गुडघ्यावर ताण पडणे किंवा मार लागणे.
- हाड मोडणे.
- लिगामेंट, कार्टीलेज, सायनोवियल सॅकशी संबंधित आजार.
- क्षयरोग वा त्यासदृश्य आजाराचा गुडघ्यामध्ये झालेला संसर्ग.
- वातसदृश्य आजार

# गुडघ्याचा आर्थ्रायटिस...

**बदलत्या जीवनशैलीमुळे सध्या तरुण वयातच गुडघा कुरकूर करू लागल्याची तक्रार ऐकायला येते. मात्र, सुरुवातीपासूनच दुर्लक्ष केल्यावर अखेर अंतिम टप्प्यातील गुडघ्याचा आर्थ्रायटिस जडल्याचे निष्पन्न होते. आर्थ्रायटिस जडल्यानंतर डॉक्टरांकडून अगदी सहज सांधे बदलाचे ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला जातो. सांधे बदलाचे ऑपरेशन ही आता नवीन बाब राहिलेली नाही. आर्थ्रायटिसमधील सांधे बदलाच्या उपचार पध्दतीची माहिती करून घेऊया...**

अनेक जण सुरवातीच्या काळात गुडघेदुखीकडे दुर्लक्ष करतात. कामाचा व्याप, घरच्या जबाबदाऱ्या, रोजची धावपळ, दगदग अशी अनेक कारणे पुढे करून सुरुवातीला गुडघेदुखीवर घरच्या घरी उपचार सुरू होतात. पण वेदना वाढत गेल्यावर डॉक्टरकडे धाव घेतात. अनेकदा तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. तोपर्यंत एखाद्याला अंतिम टप्प्यातील आर्थ्रायटिस जडलेला असतो. मग प्रदीर्घ उपचार सुरू होतात.



## गुडघेदुखी कशी टाळता येईल?

गुडघेदुखीची सगळीच कारणे टाळता येत नाही. पण नियमित व्यायाम, योगासने, लठ्ठपणा कमी करणे, हिरव्या भाज्या व फळांचा समावेश असलेला संतुलित आहार यामुळे काही प्रमाणात संधीवातापासून तसेच दुखण्यापासून दूर राहता येणे शक्य आहे.



- अंतिम टप्प्यातील गुडघ्याचा आर्थ्रायटिस : अंतिम टप्प्यातील आर्थ्रायटिस असलेल्या पेशंटच्या गुडघ्यात प्रचंड वेदना होतात. शेवटच्या टप्प्यात पेशंटचे गुडघे वाकडे झालेले असतात. पेशंटला रोजची कामे करतानाही त्रास होतो. मग वेदनाशामक गोळ्या (पेनकिसर्ल) घेतल्या जातात. पण त्यानेही आराम पडत नाही. अशा वेळेस पेशंटनी ऑपरेशन करून घेणे हिताचे ठरते.
- ऑपरेशनला पर्याय : पेशंटला औषध उपचाराने थकवा येऊ शकतो. पण फिजिओथेरेपी व वजन कमी केल्याने पेशंटला फायदा होऊ शकतो. काही वेळा गुडघ्यात इंजेक्शन घ्यावे लागते. पण गुडघ्यात इंजेक्शन घेण्याच्या कल्पनेने अनेक पेशंट घाबरतात. इंजेक्शन घेतल्यामुळे पेशंटला आराम मिळतो. पण फार तर एक वर्षापेक्षा अधिक काळ पेशंटला दिलासा मिळत नाही. पुन्हा वेदना सुरू होतात. अशावेळेस वेदनेपासून कायमस्वरुपी आराम मिळण्यासाठी सांधेबदल ऑपरेशन हाच एकमेव पर्याय ठरतो.
- ऑपरेशनमध्ये काय करतात? : या प्रकारच्या ऑपरेशनमध्ये झिजलेल्या कुर्च्यासोबत(कार्टिलेज) हाडाचा काही भाग काढून टाकला जातो. त्याजागी धातूची प्लेट व प्लास्टिक बसवण्यात येते. या ऑपरेशननंतर गुडघ्याचे आयुष्य वाढते. पण या ऑपरेशनंतर खूप काळजी घ्यावी लागते.

## शॉर्ट न्यूज

### राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जनजागृती

■ **पाथर्डी :** भारतीय लोकशाहीमध्ये मतदानाला फार मोठे महत्त्व आहे. आपल्या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपला असलेला मताचा अधिकार आणि हक्क बजावून आपले कर्तव्य पार पाडावे. वय वर्ष १८ पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली मतदार नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त पाथर्डी तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागातर्फे राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून श्री आनंद महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### गोमांसाची विक्री करणाऱ्यावर पोलिसांचा छापा

■ **नेवासा :** शहरात घरासमोर गोवंश जनावरांच्या मांसाची विक्री करणाऱ्या एकावर नेवासा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत कॉन्स्टेबल अंबादास अशोक ससाणे यांनी नेवासा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. खाटीक गल्ली येथील भालदार मस्जीद जवळ कसाई गल्लीत महाराष्ट्र राज्यात गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करण्यास मनाई असताना देखील गोवंशीय जनावरांची कत्तल करून सार्वजनिक ठिकाणी आरोग्यास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने गोमांसाची घरासमोर विक्री करताना एक जण पोलिसांना मिळून आला त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### गणेश कारखान्याचे एक लाख टन ऊस गाळप

■ **कोपरगाव :** प्रतिकूल परिस्थितीसह अनेक अडचणींवर मात करून गणेश साखर कारखान्याने आमदार बाळासाहेब थोरात व सहकारमहर्षी कोल्हे साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा सन २०२३-२४ च्या गळीत हंगामात १ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचा टप्पा पार केला आहे. गणेशचे संचालक, सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी दाखविलेला विश्वास सार्थ करीत कारखाना पूर्ण कार्यक्षमतेने चालवून गाळपाचा हा टप्पा गाठला.

### अजनूजमध्ये बिबट्याचा महिलेवर हल्ला

■ **श्रीगोंदा :** कोपीत झोपलेल्या महिलेवर बिबट्याने हल्ला करीत तिला ओढून नेण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना तालुक्यातील अजनुज शिवारात घडली. बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकलीचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा ही ग्रामस्थांमध्ये संताप पहायला मिळाला. बिबट्याच्या हल्ल्यात लक्ष्मी अरुण गायकवाड (मूळ रा. पाटोदा, चाळीसगाव) या तीन वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाल्याची घटना (दि. १९) घडली आहे. ही घटना ताजी असतानाच पुन्हा बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली.


### स्नेहसंमेलनात सांस्कृतिक, परंपरेचे दर्शन

■ **केडगाव :** येथील जे. एस. एस. गुरुकुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर महाराष्ट्रासह देशातील विविध संस्कृतीचे दर्शन घडविले. तर नृत्याविष्कारातून विविध सामाजिक विषयांवर जागृती केली. विविध हिंदी-मराठी गाण्यावर रंगलेल्या नृत्याने सांस्कृतिक कार्यक्रमात रंग भरला होता. विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर ठेका धरून एकच धमाल केली. सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित पालक, विद्यार्थी व शिक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कला गुणांना दाद दिली.

# जागरण गोंधळासाठी बकऱ्याचा बळी दिला जातो का?

■ **कुटुंबीयांच्या सर्वेक्षणातील प्रश्नांमुळे अनेक जण अचंबित**
■ **राज्य मागासवर्ग आयोगाकडून राज्यभर सर्वेक्षण**

**शिरुर : सतीश डोंगरे**




**राज्य मागास वर्ग आयोगाकडून खुल्या प्रवर्गातील कुटुंबीयांचे मंगळवारपासून (ता. २३) राज्यभरात सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे. यात "जागरण गोंधळासाठी बकऱ्याचा बळी दिला जातो का? तसेच तुमच्या घरी टीव्ही, पंखा, दुचाकी, वॉशिंग मशिन आहे?" का असे आचंबित करणारे प्रश्न कुटुंबीयांना विचारले जात असल्याने नागरिक आचंबित होत आहेत.**

शनिवारपासून शिरुर तालुक्यातील कारेगाव येथे या सर्वेक्षणास सुरुवात झाली. सर्वेक्षणासाठी प्रगणक घरोघरी जात आहेत. ही सर्व माहिती मोबाईल मध्ये एका ॲपद्वारे भरली जात आहे. मात्र ही माहिती भरताना अनेक अडथळे येत आहेत. यात कुटुंबांना अनेक प्रश्न विचारले जात आहेत. या प्रश्नांची हो किंवा नाही, अशी उत्तरे आहेत.

सर्वेक्षणादरम्यान प्रगणक घरोघरी जात असून, कुटुंबीयांना तुमच्या घरात स्नानगृह आहे का, उघड्यावर अंघोळीला जाता का, विधवा महिलांना मंगळसूत्र घालण्याची परवानगी आहे का, विधवा स्त्रिया औक्षण करू शकतात का, विधुर पुरुषांचे विवाह होतात का, विधवांना धार्मिक कार्य करू दिले जाते का, त्यांना हळदी- कुंकाला बोलावले जाते का, विवाहित स्त्रियांना डोक्यावर पदर घेणे बंधनकारक आहे का, तुमच्या घरात कोणी आत्महत्या केली आहे का? तुमच्या कुटुंबात महिलांना पुरुषांप्रमाणे अधिकार आहेत का, लग्न साधारणपणे कितव्या वर्षी केले जाते, घरात बाटलीबंद पाणी पिले जाते का, घरात स्वच्छतागृह आहे का, नसल्यास सदस्य कुठे जातात ?

कोणत्या मुला- मुलींसोबत लग्न करायचे, हा निर्णय कोण घेतो ? तुमच्या कुटुंबात आंतरजातीय विवाह झाले का? पहिला मुलगा झाला पाहिजे, अशी मानसिकता आहे का? जागरण गोंधळ गोंधळासाठी बकरा बळी दिला जातो का? आजारी व्यक्तीला लवकर बरे करण्यासाठी अंगारा दृष्ट काढणे, असे प्रकार केले जातात का ? दहा वर्षात कुणी आत्महत्या केली का? कुटुंबातील सदस्याला कुत्रा, माकड, साप, विंचू चावल्यास, कावीळ झाल्यास उपचारासाठी कुठे घेऊन जातात, असे विचित्र प्रश्न या सर्वेक्षणात विचारले जात आहेत. यामुळे हे सर्वेक्षण आहे की, कुटुंबाची खिल्ली उडवण्याचा प्रकार असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एकूण१८३ प्रश्न असून ते अतिशय किचकट स्वरूपाचे असल्यामुळे ही प्रश्नावली भरून घेण्यासाठी खूप वेळ जात आहे. त्यातच या मोबाईल मध्ये अनेक त्रुटी असल्याने अडथळे येऊन ही माहिती पुन्हा भरावी लागत आहे. त्यामुळे सर्वेक्षण करणारे संबंधित त्रासून जात आहेत.

# जयहिंद पॉलिटेक्निकच्या संघाला विजेतेपद

**विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत घवघवीत यश**



**नारायणगांव : प्रतिनिधी**

**जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव सहाणी येथे दि.२७ जानेवारी रोजी इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने डी वन झोन अंतर्गत मुलांच्या व मुलींच्या व्हॉलीबॉलच्या विभागीय स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये जयहिंद पॉलीटेक्निक कुरण च्या मुलांच्या संघाने विजेतेपद मिळवले तर मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळविले.**

यशस्वी संघांना प्रा. महेश पोकळे, प्रा. प्राजक्ता फाकटकर, श्री. हर्षल रणपिसे, क्रिडा समन्वयक प्रा. देवीराज आबूज यांनी मार्गदर्शन केले. अशी माहिती प्राचार्य डॉ. स्वप्निल पोखरकर यांनी दिली. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, सचिव विजय गुंजाळ, खजिनदार धर्मेंद्र गुंजाळ, संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे यांनी अभिनंदन केले व पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# नगर जिल्ह्यात बिबट्याचा वावर

**ऊसतोड कामगारांनी काळजी घेण्याचे आवाहन**

**नगर : प्रतिनिधी**




**नगर जिल्ह्याच्या सर्वच भागात बिबट्याचा वावर वाढला आहे. ऊसाची शेती हे बिबट्याचे प्रामुख्याने अधिवास बनलेले आहे. सध्या ऊसतोडीचा हंगाम सुरु झाला आहे. मागील १० ते १५ दिवसांत जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी तीन लहान बालकांना बिबट्याच्या हल्ल्यामध्ये आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे ऊसतोड करत असताना शेतकरी व मजुरांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन उपवनसंरक्षक सुवर्णा माने यांनी केले आहे.**

ऊसतोड सुरु असताना मजुरांनी व संबंधीत शेतकऱ्यांनी आपल्या लहान मुलांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. अनेकदा मुलांना ऊसतोड सुरू असलेल्या भागातच खेळायला मोकळे सोडले जाते. ज्या ठिकाणी मुलांना ठेवले जाते, तिथे हातात घुंगराची काठी घेऊन मोठ्या व्यक्तीने थांबावे. जेणेकरून बिबट्या दिसल्यास मुलांची सुरक्षा करता येते. खूप वाकून ऊसतोड करू नये, अशा वेळी दुसराच एखादा प्राणी आहे, असे समजून बिबट्याचा पाठमोरा हल्ला होऊ शकतो. ऊसतोड करीत असताना समूहाने कामे करावी.

## वाचकांच्या लेखणीतून

### संदर्भमूल्य असणारा काव्यसंग्रह : संत सावता दर्शन




संत सावता माळी. तेरावे शतक. ज्ञानेश्वरकालीन मराठी संत मंडळातील वयाने आणि आध्यात्मिक अनुभवाने ज्येष्ठ आणि श्रेष्ठ असे वंदनीय संत होत. संत सावता माळी सोलापूर जिल्ह्यामधील माढा तालुक्यातल्या अरण गावचे. त्यांचे आजोबा देवू. त्यांना दोन पुत्र. पुरसोबा आणि डोंगरोबा. पुरसोबांची पत्नी नांगिताबाई.

या माळी घराण्याचा पिढीजात व्यवसाय शेती. घराण्यात धार्मिक वृत्तीचे संस्कार. सावतोबांवरही वारकरी संप्रदायाचे खोल संस्कार झालेले. आयुष्यात कधीही पंढरीची वारी न केलेला वारकरी संत! कर्मे इशु भजावा या वृत्तीचे आगळेवेगळे संत! त्यांना संत सावता असेही म्हटले जाई. त्यांनी रचलेले एकंदर ४० अभंग आढळतात. संत काशिबा गुरव यांनी संत सावता महाराजांचे अभंग साहित्य लिपिबध्द केले.

या प्रातिनिधिक कवितासंग्रहात संत सावता महाराजांच्या जीवनचरित्राला तत्त्वज्ञानाला, भक्तिमार्गाला, अनुलक्षून अथवा मिश्रित स्वरुपाच्या कविता आहेत. काही अभंग वा ओवी अशा छंदोबद्ध तर काही मुक्तछंदात्मक कविताही आढळतात.

१९४४ साली संत सावता महाराजांच्या जीवनचरितावर आधारित भक्तीचा मळा हा नावाजण्याजोगा चित्रपट निघाला होत. ह.भ.प. विशाल महाराज गडगे यांनी सन २०१४ साली लिहिलेले संत सावता महाराजांचे सावता सागर प्रेमाचे आगर हे चरित्र प्रकाशित झाले. तरीही या संत सावता महाराजांच्या जीवनचरित्रातली गोडी संपत नाही! या मध्ययुगीन आगळ्यावेगळ्या संताविषयी अधिक जाणून घेणे कुणा भाविक आणि अभ्यासू समाजाला आवडणार नाही? याच प्रेरणेतून श्री संत सावता माळी युवक संघ, महाराष्ट्र राज्याच्या जुन्नर तालुका कार्यकारिणीने संत सावता दर्शन हा प्रातिनिधिक कवितासंग्रह आपल्यापुढे आणला आहे. या संग्रहाला संपादक महोदयांनी छान संपादकीय लिहिले आहे. शांती ब्रह्म श्रीगुरू मारोतीबाबा कुरेकर, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची यांनी आशीर्वचन, प्रा. डॉ दत्तात्रय डुंबरे, मराठी विभाग प्रमुख व भाषा संशोधन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी शुभेच्छा, ह.भ.प. रमेश महाराज वसेकर, श्री संतशिरोमणी सावता महाराज यांचे १६ वे वंशज यांनी आशीर्वाद, तर खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी सुरेख अभिप्राय दिला आहे.

हा प्रातिनिधिक कवितासंग्रह पेपर बाऊंड असून मुखपृष्ठ भक्तिमार्गसूचक आणि ठाशीव झाले आहे. कागदाचा दर्जा आकर्षक असून छपाई सुंदर झाली आहे. या कवितासंग्रहात एकूण ८८ प्रातिनिधिक कविता आहेत.

या संग्रहातल्या संत सावता महाराज या कवितेत सुनेत्रा टिळू म्हणतात,

**सावता झाला संत-महाराज**
**भक्तीच्या सागरा**
**अभंगांची गाज**

संत सावता महाराज हे भक्तीचा सागर आहेत. सागरातून गाज ऐकू येते. तद्वतच या भक्तीच्या सागरातून अभंगांची गाज ऐकू येते. हे वर्णन अगदी काव्यमय आणि समर्पक झाले आहे.

सावत्याचा मळा या कवितेत तुकादास ऊर्फ संभाजी भणगे सुंदर वर्णन करतात,

**सावत्याने केला मळा**
**लावी विठ्ठलास लळा**
**मोट चालवी सावता**
**पाणी वळवी सावळा**

यात विठ्ठलाला सावळा असे संबोधले आहे. मळा, लळा, सावळा हे यमक काव्यार्थाची शोभा आणखीच वाढवितात.

व्यंकटेश देशमुख संत सावता कवितेत सांगतात,

**सारे संत, महंत**
**जाती पंढरीसी भेटाया**
**सावता असा संत**
**भेटायासी येतो विठुराया**

संत सावता महाराज कधीही पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी गेले नाहीत. आपल्या कृषिकर्मातच ते विठ्ठलरूप पाहत. म्हणूनच स्वतः विठ्ठलच सावतोबांना भेटण्यासाठी अरणगावी आले. असा त्यांच्या चरित्रात उल्लेख आहे.

तीच परंपरा आजही जपली जाते. म्हणून सुवर्णा लोंढे भक्तीचा मळा या कवितेत म्हणतात,

**आषाढी वारीत नाही, तोटा भक्तांच्या दाटीला**
**आजही पंढरीचा राणा, जातो सावत्या भेटीला**

या संग्रहातील धन्य संत शिरोमणी ही भारती कापरे यांची काव्यरचना प्रसाद गुणाने नटलेली आहे. त्या म्हणतात,

**लपला विठ्ठल अंतरी जयाच्या**
**शरण मी जाते चरणी तयाच्या**

या काव्य ग्रंथाला शुभेच्छा देताना प्रा.डॉ.दत्तात्रय डुंबरे म्हणतात, सावता महाराजांविषयी काव्यातून विस्तृत माहिती देणारा हा एक संदर्भ ग्रंथच म्हणावा लागेल. असा हा प्रातिनिधिक कवितासंग्रह काव्यरसिकांनी वाचावा आणि संग्रही ठेवावा असाच आहे.

संत सावता दर्शन
**(प्रातिनिधिक कवितासंग्रह)**
**संपादक : विशाल महाराज गडगे**
**संदीप वाघोले, प्रा. विजय लोंढे**
**प्रकाशक : यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे.**
**प्रथमावृत्ती : १० डिसेंबर २०२३.**
**मूल्य : रु.१५०/-**

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### अशोककाका कटारिया यांना अटक

या गुन्हयाची पोलीसांकडून चौकशी सुरू असताना व्यक्ती मोठी असल्याने फॉरेन्सिक ऑडीट करण्यात आले होते. त्यानंतर या गैरव्यवहारात कोणाचा सहभाग आहे या बाबी पुढे आल्या व तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली आहेत.

फॉरेन्सीक ऑडीट नंतर बँकेतील घोटाळा २९१ कोटी २५ लाख रूपयांचा असल्याची तसेच त्यात १०२ आरोपींचा सहभाग असल्याची माहीती पोलीसांच्या हाती आली आहे. पोलीसांनी धरपकड सुरू केल्याने माजी पदाधिकारी व संचालकांमध्ये एकच खळबळ उडाली असून बहुतांश संचालक फरार झाले आहेत.

सन २०२१ मध्ये निवडूण आलेल्या संचालकांची बँकेवर सत्ता होती. नव्या संचालक मंडळाच्या स्थापनेनंतर अवघ्या काही दिवसांतच रिझर्व बँकेने बँकेच्या कामकाजावर निर्बंध आणले होते. पुढे बँकींग कामकाज तसेच थकबाकी वसुलीही पुरेशी समाधानकारक होत नसल्याने बँकेचा बँकिंग व्यवहार परवाना रद्द का करण्यात येउ नये अशी नोटीस रिझर्व बँकेने २२ जुलै २०२२ रोजी बजावली होती. या नोटीसला बँकेच्या संचालक मंडळाकडून समाधानकारक उत्तर न देण्यात आल्याने रिझर्व बँकेने बँकेचा परवानाही रद्द केला आहे.

# आरटीआय कार्यकर्त्यांनी लोकायुक्त कायद्याचा अभ्यास करावा

■ **अण्णा हजारे यांचे आवाहन** ■ **आरटीआय कार्यकर्त्यांचे राज्यस्तरीय शिबीर**
■ **माहिती अधिकार सक्षमतेसाठी राज्यस्तरीय आंदोलनाचा निर्धार**



**राळेगणसिद्धी : प्रतिनिधी**

**माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आता लोकायुक्त कायद्याचा अभ्यास करावा. लवकरच लोकायुक्त कायदा लागू होईल. त्यासाठी लोकशिक्षण, लोकजागृती करण्यासाठी कार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केले. ते राळेगणसिद्धी येथे झालेल्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या राज्यस्तरीय अधिवेशनप्रसंगी मार्गदर्शन करताना बोलत होते.**

ज्ञानमाता सेवाभावी संस्थेच्या वतीने राज्यभरातील माहिती अधिकार कार्यकर्त्यांचे राज्यस्तरीय अधिवेशन राळेगणसिद्धी येथे रविवारी पार पडले. या शिबिरात विविध जिल्ह्यातील दिडशे कार्यकर्ते सहभागी झाले होते अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष आब्राहम आढाव यांनी दिली. सकाळच्या सत्रात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दीपक कुमार गुप्ता यांच्या उपस्थितीत अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कमांडो गौतम धवणे, वामन साळवे, आब्राहम आढाव, धनराज गायकवाड, हेमराज सोनवणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी माहिती अधिकारातील विविध समस्यांबाबत परिसंवाद झाला. त्यानंतर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात अध्यक्षस्थानी असलेल्या साहित्यिक,गझलकार संजय पठाडे यांचे माहिती अधिकार: एक प्रदीर्घ लढा या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी नितीन यादव, अर्जून रासने, राजाभाऊ पवार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यानंतर कार्यकर्त्यांनी अनुभव कथन केले. समारोपप्रसंगी राज्याच्या विविध भागात माहिती अधिकार कायद्याचा प्रचार प्रसार करणार्या निवडक कार्यकर्त्यांना पठाडे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी माहिती अधिकार प्रशासनात रिक्त जागी विभागीय आयुक्तांच्या नियुक्त्या, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा आणि कलम चारची प्रभावी अंमलबजावणी इत्यादी विषयांवर लवकरच राज्यस्तरीय आंदोलन छेडण्याचा ठराव या अधिवेशनात करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खंडू गव्हाणे, योगेश करपे, दिपक पायगुडे, रामदास सातकर, अन्सार शेख, नाना आवारी इत्यादींनी प्रयत्न केले.

# वडगाव सावताळच्या चार जणांचा जागीच अपघाती मृत्यू

■ पांढरीपूलाजवळ कंटेनर,दुचाकींची धडक
■ मृतकांमध्ये दोन चिमुकल्यांचा समावेश



**नगर : प्रतिनिधी**

**नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर पांढरीपूल येथे रविवारी (ता. २८) कंटेनर आणि दुचाकींच्या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर एक जण जखमी झाल्याची घटना सायंकाळी चारच्या सुमारास घडली. या अपघातात आई-वडिलांसह दोन भावंडांचा जागीच मृत्यू झाला.**

माहितीनुसार, रविवारी सायंकाळी चारच्या सुमारास अहमदनगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर पांढरीपूल येथे कंटेनरने धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला. मयतांमध्ये दोन चिमुकल्यांचा समावेश असून या घटनेने पारनेरमध्ये मोठी खळबळ उडाली. अनिल बाळासाहेब पवार, सोनाली अनिल पवार, माउली अनिल पवार आणि एक सहा महिन्यांची मुलगी (सर्व रा. वडगाव सावताळ,ता. पारनेर) अशी दुचाकीवरील मृतांची नावे आहेत.

इमामपूर घाटाच्या तीव्र उतारावरून छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या कंटेनरने पुढे चाललेल्या मोपेड दुचाकीला तसेच अजून दुसऱ्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली.ही घटना सायंकाळी चारच्या सुमारास घडली. त्यामध्ये मोपेड दुचाकीवरील चार जणांचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या दुचाकीवरील भगवान आव्हाड (रा. पांगरमल, ता. नगर) हे जखमी झाले आहेत. या अपघातानंतर कंटेनर चालक फरार झाला. मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव सावताळचे पवार कुटुंब हे कापूरवाडी (ता. नगर) येथे कांदा काढणीच्या कामासाठी एक ते दीड महिन्यापासून नगर तालुक्यात होते. मात्र एकाच वेळी कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्यामुळे वडगाव सावताळ गावावर शोककळा पसरली आहे.

# लोकनेते ११ रांधे प्रिमियर लीगचा मानकरी

## तेरा वर्षाच्या अथर्व थोरातची चमकदार कामगिरी

निघोज : प्रतिनिधी

**समस्त ग्रामस्थ रांधे यांनी दि.२६ ते २८ जानेवारी २०२४ कालावधीत आयोजित केलेल्या रांधे प्रिमियर लिग २०२४ चा मानकरी ज्ञानदेव थोरात अन्वर शेख व प्रमोद साबळे यांच्या मालकीचा लोकनेते ११ हा संघ ठरला असून विठ्ठल साबळे यांच्या मालकीचा रांधे सुपर जायंट्स हा संघ उपविजेता ठरला.**



तृतीय क्रमांक रुपेश टाव्हरे आणि प्रदीप सरोदे यांच्या मालकीचा विठ्ठलवाडी टायगर्स तर चतुर्थ क्रमांक संतोष काटे भगवान पावडे व अविनाश आवारी यांच्या मालकीचा रांधे फायटर्स यांनी पटकावला यावेळी या विजेत्या संघाना रोख बक्षिसे तसेच चषक देऊन सन्मानित करण्यात आले. बक्षिस वितरण पंचायत समितीचे माजी सदस्य डॉ .भास्करराव शिरोळे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला याप्रसंगी गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य चेअरमन व्हा चेअरमन सेवा सोसायटी सदस्य गावातील मान्यवर मंडळीच्या हस्ते बक्षिस वितरण समारंभ संपन्न झाला.

या स्पर्धेत संपूर्ण स्पर्धेत चमकदार कामगिरी करणारा रोहन साबळे मालिकावीर अष्टपैलू कामगिरी करणारा संतोष कोरडे अंतिम सामन्याचा सामनावीर जुना आणि अनुभवी खेळाडू विक्रम आवारी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट फलंदाज तर अनेक वर्षे रांधे क्रिकेट आपल्या गोलंदाजीने गाजवलेले प्रमोद साबळे आणि महेश आवारी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट गोलंदाज ठरले. या सर्वोत्कृष्ट खेळाडूंना रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक उद्योजक संजय बाबर व उद्योजक संतोष चाटे यांजकडून,द्वितीय क्रमांक कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बापूशेठ शिर्के व म्हस्केवाडी गावचे उपसरपंच गोविंदशेठ साबळे यांजकडून तृतीय क्रमांक निलेश लंके प्रतिष्ठानचे जिल्हा अध्यक्ष मेजर कारभारी पोटघन व वडझिरे ग्रा प सदस्य व युवा नेते अनिल गंधाक्ते यांज कडून चतुर्थ क्रमांक शिवसेना उपजिल्हा प्रमुख रामदास भोसले व चोंभूत गावचे सरपंच दत्तात्रय म्हस्के यांनी दिले होते चषक सौजन्य अनुक्रमे नांदूर पठार गावचे माजी सरपंच दिनेश घोलप यांजकडून प्रथम धर्मवीर शभुराजे प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा सचिनशेठ गोडसे यांजकडून द्वितीय शिर्डी नगरपरिषदेचे अधिकारी प्रदीप आवारी यांजकडून तृतीय तर चतुर्थ क्रमांकचा चषक सौजन्य युवा उद्योजक नवनाथ भोसले यांजकडून देण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी युवा उद्योजक सदानंद आवारी,डॉ भास्करराव शिरोळे मेजर, कैलास आवारी, युवा उद्योजक अनिलशेठ आवारी, सूर्यकांतअप्पा आवारी, मुन्नाशेठ पगारिया, प्रदिप चकवे, विशाल आवारी ,राजू कदम, राजू डेरे यांजकडून ही या स्पर्धेसाठी भरीव असे सहकार्य लाभले. शेवटी हृतिक फापाळे व रोहन साबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### गावलीगच उद्दिष्ट सफल

**रांधे प्रिमियर लीग मध्ये १३ वर्षाच्या अथर्व थोरातने आपल्या सुरेख गोलंदाजीने सर्वांची मने जिंकत चमकदार कामगिरी केली आणि गावचा एक उदयोन्मुख खेळाडू ठरला तर चाळीशी पार केलेल्या व नोकरी व्यवसायामुळे खेळापासून दूर असलेल्या खेळाडूची कामगिरी सुद्धा चमकदार झाली नव्या आणि जुन्याच्या सुरेख कामगिरीने गावातील तरुणांना यानिमित्ताने एकत्र आणून एकप्रकारे स्नेहमिलन घडवून आणण्याचा आयोजकांचा उद्दिष्ट यातून सफल झाल्याचे दिसले.**

### ग्रामीण क्रिकेटमुळे आंतरराष्ट्रीय सामन्याची आठवण

**रांधे प्रिमियर लीगमधे नुकत्याच खेळल्या गेलेल्या भारत अफगाणिस्तान सामन्याच्या सलग दोन सामन्याची आठवण करून दिली लोकनेते ११ आणि विठ्ठलवाडी टायगर्स यांच्यात खेळले गेलेल्या पहिल्या सत्रातील सामना सलग २ वेळा बरोबरीत सुटला आणि तिसऱ्या टाय सामन्यात १३ वर्षाच्या अथर्व थोरातने सामना लोकनेते ११ संघाला जिंकून दिला.**

# विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा अनावश्यक वापर टाळावा

## डॉ. संजय कळमकर यांचा सल्ला

भाळवणी : प्रतिनिधी

**जुन्या काळातील जीवन पद्धती व आनंद यामुळेच खरी जीवनप्रणाली विकसित झाली.सध्याच्या मोबाईल युगामुळे आनंद हरवत चालल्याची खंत व्यक्त करतानाच विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा अनावश्यक वापर टाळण्याचा सल्ला प्रसिद्ध साहित्यिक डॉ.संजय कळमकर यांनी दिला.**



रयत शिक्षण संस्थेच्या भाळवणी येथील महात्मा फुले माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोपप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संजय कळमकर बोलत होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य ज्ञानदेव पांडुळे होते.

डॉ. कळमकर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सर्व पालक विद्यार्थी यांना पुस्तके वाचण्याचा सल्ला दिला, पुस्तकामुळे ज्ञान समृद्ध बनते तुम्हाला उत्तम वक्ता बनायचे असेल तर तुमचे वाचन हे अफाट असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. अध्यक्षीय भाषणात श्री ज्ञानदेव पांडुळे यांनी सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर होणे ही काळाची गरज आहे व यामध्ये पालकांनी सहभागी होऊन आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी स्वतः त्याग करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला.विद्यालयाच्या माजी विद्यार्थी एस.एस.सी.बॅच १९९९ तसेच भाळवणी ग्रामीण पतसंस्था यांच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे रयत गुरुकुल सहशालेय उपक्रमातील विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच शासकीय स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या १५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या प्रसंगी विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष मुरलीदादा रोहोकले, स्कूल कमिटीचे सदस्य बबलूशेठ रोहोकले, संदीपशेठ रोहोकले व पालकवर्ग विद्यार्थ्यांच्या गुणगौरवासाठी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक आर.वाय. कोरडे यांनी केले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांचे स्वागत ,परिचय आय.आय. तांबोळी यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नानासाहेब शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री जी.एन.जाधव, अप्पासाहेब कदम, प्रगती रोहोकले, अर्चना अनारसे,ललिता धामणे, तेहसीन शेख, अमोल भोंडवे, विष्णू शिंदे, रोहिणी झावरे, एस.के. सानप,महेश महांडूळे, संदीप वाघ यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवकांनी प्रयत्न केले.

### भाळवणी विद्यालय रोल मॉडेल

**भाळवणी विद्यालय हे संस्थेला नेहमीच दिशादर्शक राहिलेले असून यासाठी गावातील पालक स्कूल कमिटी हे नेहमीच तत्पर असतात.भाळवणी विद्यालयात राबविण्यात येत असलेले ओपन डे व इतर गुणवत्तेचे उपक्रम संस्था रोल मॉडेल म्हणून संपूर्ण जिल्ह्यात राबवित आहे.विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल असून विद्यार्थ्यांनी सर्वच उपक्रमात सहभाग घ्यावा.**

**ज्ञानदेव पांडुळे**
**जनरल बॉडी सदस्य**

---

# एकजूट हीच हिवरेबाजारची ओळख ! कर्नल चेतन गुरबक्ष यांचे गौरोद्गार



हिवरेबाजार : प्रतिनिधी

**भारतीयांच्या एकजूटीमुळेच ७५ वर्षांपूर्वी देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचे सांगत हिच एकजूट हिवरे बाजार ग्रामस्थांमध्ये टिकून आहे हीच या गावाची ओळख असल्याचे गौरोद्गार १७ महाराष्ट्र बटालियन अहमदनगरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल चेतन गुरूबक्ष यांनी काढले.प्रजासत्ताकदिनी हिवरे बाजार येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.**

यावेळी पुढे बोलताना कर्नल चेतन गुरबक्ष म्हणाले की,आपल्या सर्व भारतीयांना ७५ वर्षांपूर्वी जे स्वातंत्र्य मिळाले ते एकजुटीमुळेच मिळाले. आपल्या देशाची धर्म भाषा,संस्कृती, वेशभूषा यामध्ये विविधता आहे परंतु आपण सर्व एकत्र जोडले गेलेलो आहोत, ‘‘ हम सब एक है , हम सब भारतीय है ‘‘ हे सांगताना कर्नल गुरूबक्ष म्हणाले, कोरोना काळात आपल्या तरुण पिढीने खूप मेहनत घेतली तसेच शास्त्रज्ञांनी विविध लसी औषधे तयार करून सर्वांपर्यंत पोहोचवली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणलेल्या डिजिटल इंडियाने संपूर्ण देश एकत्र जोडून ठेवला आहे. शहर आणि खेडेगावात आता फरक राहिला नाही सगळीकडे विकास व्हायला लागला आहे.

डांबरी रस्ते, इमारती, शाळा महाविद्यालय सगळीकडे झालेत. आपला देश थोड्याच दिवसात अवकाशात सर्वात उंचावर भरारी घेईल परंतु पावले जमिनीवरच असतील. आपल्या देशाचे हे एक मोठेपण आहे.देशाची प्रगती झपाट्याने होत आहे आपल्या गावातही पद्मश्री डॉ.पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आपण गावाचे नाव देशाच्या नकाशावर कोरले आहे. आपल्या गावात संपूर्ण जगभरातून लोक गाव पाहण्यासाठी येतात आपणही हे सर्व मिळून मिसळून केले आहे एकतेतून निर्माण झाले आहे. देश स्वतंत्र झाला त्यावेळेस एनसीसी ची स्थापना झाली आज एनसीसी मध्ये १३ लाख छात्र आहे एनसीसी चा उद्देश एकतेतून उद्याचे नेतृत्व बनवणे हेच आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे एनसीसी छात्र होते, इंडियन आर्मीचे प्रमुख हे सुद्धा एनसीसी छात्र होते, उद्याचे नेतृत्व घडवण्याचे काम एनसीसी करत असल्याचेही कर्नल गुरूबक्ष यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजीराव लांगोरे म्हणाले की,हिवरे बाजारने पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून ग्रामविकासाचे रोल मॉडेल म्हणून संपूर्ण देशाला दिशा देणारे गाव ठरले आहे.

याप्रसंगी सुभेदार मेजर लोकेंदर सिंग, हिवरेबाजारच्या सरपंच सौ. विमलताई ठाणगे,चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा.चेअरमन रामभाऊ चत्तर, हरिभाऊ ठाणगे , बाबासाहेब गुंजाळ, दामोदर ठाणगे, अर्जुन पवार,एस.टी. पादीर, रोहिदास पादीर ,सहदेव पवार, माजी सैनिक धर्मराज ठाणगे, मंगेश ठाणगे, राजू ठाणगे तसेच एनसीसी छात्र, शालेय विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खारवाडी शाळेच्या पाण्याच्या टाकीचे भुमिपूजन



ढवळपुरी : प्रतिनिधी

**येथील खारवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या ७ हजार लिटर पाण्याच्या टाकीचे प्रजासत्ताक दिनी भुमिपूजन करण्यात आले.**

यावेळी ढवळपुरी सेवा सोसायटीचे चेअरमन भागाजी गावडे,उपसरपंच बबनराव पवार सर,ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र व्यवहारे,चंद्रकांत भालेराव, राजेंद्र भालेराव, दत्तात्रय वलेकर, राजेंद्र रभाजी भालेराव, राजु गव्हाणे,शिवाजी तांबे गुरुजी,दामुतात्या भालेराव, सिताराम जाधव, शिक्षक बाळासाहेब रोहोकले,रमेश झावरे ,ग्रामपंचायत सदस्य सोनु भालेराव, आकाश भालेराव, भाळवणीचे माजी चेअरमन सुरेशशेठ रोहोकले,ठेकेदार अनिल तांबडे, व खारवाडीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते,

याप्रसंगी राजेंद्र भालेराव यांचे चिरंजीव ओमकार भालेराव यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून मुलांसोबत मनमुराद खेळण्याचा आनंद लुटला.

# डी.बी.एम.स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## अण्णांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

राळेगणसिद्धी: प्रतिनिधी

**येथील डी.बी.एम. स्कुलमध्ये ७५ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी स्वातंत्र्याचे महत्व विशद करीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**



प्रमुख पाहुणे डॉ. नीलेश उगले, कृषी उपसंचालक अश्विनी पठारे, संस्थापक अध्यक्ष जे.डी. मापारी ,प्राचार्य सौ शितल मापारी, जयसिंग भागुजी मापारी व राळेगणसिद्धीचे सरपंच जयसिंग मापारी. यांच्या उपस्थितीत आनंददायी राष्ट्रीय कार्यक्रम साजरा झाला. विद्यार्थ्यांनी सर्व उपक्रम उत्साहाने पार पाडले.

सकाळी ध्वज फडकावून आणि त्यानंतर राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गाणे, नृत्य, भाषणे, परेड रिंग मास ड्रिल, एकांकिका यांसह अनेक देशभक्तीपर कार्यक्रम मोठ्या उत्साहात सादर करण्यात आले. झांज पथक व लाठी काठी सादरीकरण हा आकर्षक कार्यक्रम होता. कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी आणि त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सैनिकांना विशेषतः आमंत्रित करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांनी शिक्षक, विद्यार्थी आणि व्यवस्थापन यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती रोकडे आणि श्रीमती पोटे यांनी केले होते. श्रीमती कदम यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

# अळकुटी महाविद्यालय प्रबोधनाचे केंद्र ! मेजर दर्शन दाते यांचे प्रतिपादन

चोंभूत : प्रतिनिधी

**अळकुटी महाविद्यालयाने गेली वीस वर्षात ग्रामीण भागात अतिशय उल्लेखनीय असे प्रबोधनाचे कार्य केले आहे. म्हणूनच आमच्यासारख्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या शासकीय नोकऱ्यांमध्ये स्थान मिळवून महाविद्यालयाचा आलेख उंचावत ठेवला आहे. अळकुटी महाविद्यालय म्हणजे प्रबोधनाचे एक केंद्रच आहे. असे प्रतिपादन अळकुटी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मेजर दर्शन दाते यांनी केले.**



पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी मेजर दर्शन दाते, पॅरा आर्मी आसाम यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मेजर दर्शन दाते यांनी आपण या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहोत याचा अभिमान व्यक्त केला. पारनेर पंचायत समितीचे माजी सदस्य तथा नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भास्करराव शिरोळे यांनी महाविद्यालयाच्या एकूण कार्यक्रमाचा आढावा घेत महाविद्यालयाच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी पाडळी गावचे माजी सरपंच भाऊसाहेब डेरे, संतोष क्षीरसागर, तसेच सर्व प्राध्यापक, प्राध्यापक तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती फापाळे व क्रीडा विभागप्रमुख प्रा.राजाराम गोरडे यांनी केले तर आभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी मानले.

---

# संभाजी रोहोकले यांचे निधन

भाळवणी : प्रतिनिधी

**भाळवणी येथील सेवानिवृत्त वीजतंत्री संभाजी बबनराव रोहोकले यांचे आज (सोमवारी) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते.**



कै. संभाजी रोहोकले यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमध्ये अनेक वर्षांच्या नंतर ते निवृत्त झाले होते. सेवानिवृत्तीनंतर भाळवणीच्या सामाजिक जडणघडणीत त्यांचा सहभाग राहिला.

सोमवारी सकाळीच्या दरम्यान् हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने रुग्णालयात पोहचण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा सुभाष ,रोहिदास, सुना.नातवंडे असा परिवार आहे.आज दुपारी शोकाकुल वातावरणात भाळवणी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# गणेश शेळके जिल्हा खरेदी विक्री संघाचे संचालक

## नारायणगव्हाण ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



नारायणगव्हाण : प्रतिनिधी

**तालुका खरेदी विक्री संघाचे मा. संचालक गणेश विक्रम शेळके यांची जिल्हा खरेदी विक्री संघाच्या संचालकपदी नुकतीच बिनविरोध निवड झाली. शेळके यांनी यापूर्वीही जिल्हा खरेदी विक्री संघाचे संचालक म्हणून काम पहिलेले आहे.**

गणेश शेळके हे जिल्हा बँकेचे दिवंगत व्हा. चेअरमन ग्रामरत्न विठ्ठलराव शेळके यांचे नातू आहेत. आजोबांच्या पावलावर पाउल ठेऊन गणेश हे सहकार क्षेत्रात काम करीत असून त्यांच्या या निवडीबद्दल नारायणगव्हाणचे माजी सरपंच, पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन, जातेगांव येथील श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त सुरेश बोऱ्हुडे, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे मा. चेअरमन बाळासाहेब चव्हाण, बबनराव खोले, अण्णा चव्हाण, अरूण चिपाडे आदींनी ग्रामस्थांच्या वतीने शेळके यांचा सत्कार केला.

# निघोज सोसायटीत पाच स्विकृत संचालक

## सुनील वराळ, शांताराम लाळगे यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी

**निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या स्विकृत संचालकपदी पाच सदस्यांची निवड करण्यात आल्याची माहीती चेअरमन सुनील वराळ व व्हाईस चेअरमन शांताराम लाळगे यांनी दिली.**

स्विकृत संचालकांच्या निवडीसाठी बोलविण्यात आलेल्या बैठकीस संस्थेचे मार्गदर्शक माजी सरपंच ठकराम लंके, शिवबा संघटनेचे संस्थापक तथा युवा सेनेचे तालुकाप्रमुख अनिल शेटे, जय मल्हार देस्स्थान ट्रस्टचे सचिव सचिन शेळके आदी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते नवनिर्वाचित स्विकृत संचालकांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.

यावेळी सोसायटीचे चेअरमन सुनील वराळ, व्हा. चेअरमन शांताराम लाळगे, संचालक वसंत ढवण, शांताराम कवाद, दत्तात्रेय लंके, रामदास रसाळ, शिवाजीराव लंके, संतोष लामखडे, अंकुश लोखंडे, संतोष लामखडे, अंकुश लोखंडे, हिरामण सोनवणे, असिम हवालदार, मंदा अशोक ढवळे, मनिषा नाना वराळ, सोसायटीचे सचिव रामदास भोसले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. पाचही नवविर्वाचित संचालकांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.



■ निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या स्विकृत संचालकपदी निवड झालेल्या पाचही सभासदांना त्यांचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. (छाया : संदीप ईधाटे)

### हे आहेत स्विकृत संचालक

**बाळू दगडू घोगरे, लहु मच्छिंद्र ढवण, राजेश भाउसाहेब बोदगे, अनिल किसन लामखडे, सुखदेव सखाराम वाव्हळ**

### सोसायटीमुळे सभासद स्वयंपुर्ण

**विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या माध्यमातून सभासद शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होत असल्याने सोसायटीमुळे शेतकरी सभासद स्वयंपुर्ण हो आहेत. जिल्हा सहकारी बँक तसेच सरकारच्या माध्यमातून सभासदांसाठी विविध योजना राबविण्यात येत असल्याने सभासदांसोबतच सोसायटीही प्रबळ होत आहे.**

**वसंत कवाद**
**अध्यक्ष, बाबासाहेब कवाद निघोज नागरी पतसंस्था**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com